22 MAY 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महासत्ता होण्यासाठी शिवरायांचे विचार महत्त्वाचे

## उदय माहूरकर : पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमाला

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देश महासत्ता होण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार समजून घेणे, तसेच त्यांच्या मार्गाने जाणे महत्त्वाचे ठरणार आहे. महासत्ता होण्यातील अडथळे दूर होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन केंद्रीय माहिती आयुक्त उदय माहूरकर यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत राजर्षी शाहू स्मारक भवनमध्ये 'भारत : एक जागतिक महासत्ता' या विषयावर बोलत होते.




पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत बोलताना केंद्रीय माहिती आयुक्त उदय माहूरकर. व्यासपीठावर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व अन्य मान्यवर.

माहूरकर म्हणाले, मानवतावादी दृष्टिकोनातून जगातील लहान देशांना मदत करण्याची भूमिका भारताला विश्वगुरू बनविण्याच्या दिशेने नेत आहे. देशातील निवडणुकांवर अनावश्यक वेळ खर्च होतो, तो टाळायला हवा. त्यासाठी लोकसभा, विधानसभा या निवडणुकांमध्ये एकसूत्रता आणायला हवी. पाच वर्षांचा कालावधी संपल्यानंतर ठरावीक महिन्यात निवडणुका घ्यायला हव्यात. सोशल मीडियावर सध्या बीभत्स लैंगिक आशय प्रसिद्ध होत आहे. अशा आशयापासून नव्या पिढीला परावृत्त करणे गरजेचे आहे.

व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. यावेळी डॉ. प्रतापसिंह जाधव, डॉ. योगेश जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेत डॉ. ग. गो. जाधव यांचे योगदान मोठे होते. या व्याख्यानास प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते. डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत केले. विश्वराज जोशी यांनी सूत्रसंचालन केले. रणधीर शिंदे यांनी आभार मानले.


22 MAY 2022 तरुण भारत जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आरोग्यदायी जीवनासाठी जैवविविधता संवर्धन

## विद्यापीठात फुलला अवघा पश्चिम घाट : साडेआठ एकरमध्ये दीड हजार दुर्मीळ औषधी वनस्पती

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

जैवविविधता सामुहिकरित्या लुप्त होताना दिसत आहे. त्यामुळे देशभरात यंदा वाढलेले तापमानच जैवविविधता संवर्धनाची गरज असल्याचा इशारा देत आहे. वाढते तापमान रोखण्यासाठी प्रत्येक मानवाने सामुहिकरित्या झाडे लावून संवर्धन करावीत. कारण मानवाची गरज असलेले अन्न, औषध आणि ऑक्सिजन वृक्षांपासूनच मिळतात. मानवाच्या या गरजा पूर्ण करण्यासाठी मानवाला वृक्ष लागवडीशिवाय पर्याय नाही. त्यामुळे पश्चिम घाटासह जगभरातील १५०० वनस्पती विद्यापीठातील साडे आठशे एकर परिसरात फुलल्या आहेत. एवढेच काय पण बोटॅनिकल गार्डनमध्ये दुर्मिळ वनस्पतींचे साम्राज्य असून त्यावरील अनेक संशोधनांना पेटंट मिळाली आहेत. जैवविविधता संवर्धन केले तरच पृथ्वीवर मानवाचे अस्तित्व राहिल, असा जणू विद्यापीठातील शास्त्रज्ञ आपल्या संशोधनातून निष्कर्ष काढत आहेत. आज (दि. २२) जैवविविधता दिनानिमित्त वनस्पती आणि संवर्धनासंदर्भात 'तरुण भारत'ने घेतलेला आढावा.



### वनस्पती प्रजात संवर्धनाची गरज

खाण्यामध्ये विविधता असेल तरच माणसाची प्रकृती चांगली राहते. आताच्या काळात अन्नपदार्थांची विविधता कमी होत आहे. जैवविविधतेतून शरीराला पोषक तत्वे मिळतात. कोणत्याही वनस्पतीची प्रजात नष्ट झाली तर पुन्हा ती तयार करणे मानवाच्या हातात नाही. त्यामुळे कायमची नष्ट होणारी प्रत्येक प्रजात संवर्धन केली पाहिजे. तरच आरोग्यदायी जीवन जगता येईल.

**डॉ. एस. आर. यादव (वनस्पतीशास्त्र ज्येष्ठ संशोधक)**

अनेक वनस्पतींच्या रूपाने नैसर्गिक समृध्दी आहे. परिणामी वातावरणातील बदल आणि वाढते तापमान पाहून भारत व राज्य शासनाने जैवविविधता संवर्धनाची मोहिम हाती घेतली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या परिसरातही हिरवळ फुलली आहे. ऐवढेच नव्हे तर वनस्पतीशास्त्र विभागातील लीड बोटॅनिकल गार्डनमध्ये तब्बल बाराशे दुर्मिळ औषधी वनस्पतींचे संवर्धन केले असून यामध्ये दिवसेंदिवस भर पडत आहे. बोटॅनिकल गार्डनमधील वनस्पती पाहून निसर्गप्रेमींच्या डोळयांचे पारणे फिटते. या वनस्पती पाहण्यासाठी शाळा-कॉलेजमधील सहलीही येतात. विद्यार्थ्यांना वनस्पती संवर्धनाची आवड निर्माण




करण्याचा शाळांचा प्रयत्न आहे. परंतू पालकांनी शाळा-महाविद्यालयाच्या प्रयत्नाला कृतीची जोड दिली तर पुढच्या पिढीच्या भवितव्यासाठी ही नैसर्गिक संपत्ती संवर्धनाचे काम वेगाने होईल. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्षलागवड अत्यंत महत्वाची आहे, हा संदेश प्राचीन काळापासून दिला जात आहे. त्यामुळे बोटॅनिकल गार्डनमधील हरीगृहांमध्ये औषधी वनस्पती वाढवल्या जातात. विशिष्ट अवस्थेत आल्यानंतर तयार केलेल्या काचेच्या पेट्यांमध्ये विशिष्ट तापमानात वाढवल्या जातात. त्यांची वाढ झाल्यानंतर संवर्धनाचे काम सुरू होते. औषधी वनस्पतींच्या आधारे केलेल्या बहुतांश संशोधनाला पेटंट मिळाली आहेत. डॉ. डी. के. गायकवाड यांनी स्तनाच्या कॅन्सरवर उपचार करण्यासाठी लक्ष्मीतरू वनस्पतीवर केलेल्या संशोधनाअंती औषध तयार केले आहे. या संशोधनाला नुकतेच पेटंट मिळाले आहे. अशा प्रकारे विद्यापीठात पश्चिम घाटातील औषधी वनस्पतींवर सातत्याने संशोधन सुरू आहे. जागतिकीकरणात विविध वनस्पतींच्या प्रजाती नष्ट होत असताना मात्र विद्यापीठ पातळीवर जैवविविधता संवर्धनाचा प्रयत्न होताना दिसतो. याला व्यापक स्वरूप देण्यासाठी सामुदायिक प्रयत्नाची गरज आहे.

### विद्यापीठातील संवधीत दुर्मिळ वनस्पती

| | |
|---|---|
| तमीळनाडूतील वनस्पती ब्राचीसटेल्म सिलीओलॅटम | १ |
| शिरोपिजिआ-भारतातील प्रजाती | ६५ |
| महाराष्ट्रातील प्रजाती | २५ |
| संकटग्रस्त प्रजाती | २५ |
| नारळाच्या प्रजाती | ६५ |
| सायकॅडस प्रजाती | २५ |
| भारतातील केळी प्रजाती | १२ |
| महाराष्ट्र गवत प्रजाती | ४१५ |
| शिवाजी विद्यापीठ गवत प्रजाती | १५० |

22 MAY 2022 पुण्यनगरी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिद्द असेल तर काहीच अशक्य नाही

## संदीप माळवी : विद्यापीठातील जर्नालिझम विभागातर्फे सत्कार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मनात जिद्द असेल तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही; पण त्यासाठी कठोर मेहनत करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी व्यक्त केले. माळवी यांची ठाणे महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी निवड झाल्याबद्दल शिवाजी विद्यापीठ येथे जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागातर्फे आयोजित सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.



कोल्हापूर : ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांचा शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागातर्फे सत्कार करताना विभागप्रमुख डॉ. निशा पवार. सोबत अन्य मान्यवर.

यावेळी माळवी यांनी प्रेरणादायी जीवनप्रवास विद्यार्थ्यांसमोर उलगडला. कवी, लेखक, विविध दैनिकांमध्ये पत्रकार, जनसंपर्क अधिकारी आणि प्रशासनातील योगदान याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांसमवेत मुक्त संवाद साधला. विद्यार्थ्यांनी परिस्थितीला दोष देऊन हार मानण्याऐवजी परिस्थितीवर मात केली पाहिजे, असेही ते म्हणाले. याप्रसंगी त्यांनी स्वरचित गझल विद्यार्थ्यांसमोर सादर केली. विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला. आभार सहयोगी व्याख्याते सचिन दिवाण यांनी मानले. यावेळी डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, टाटा ट्रस्ट मुंबईचे सोहेल जमादार आदी उपस्थित होते.

लोकमत

# मधमाशी संवर्धन काळाची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

**कळंबा** : पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी मधमाशी संवर्धन काळाची गरज असल्याचे मत शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागाचे डॉ. ए. डी. जाधव यांनी व्यक्त केले. कळंबा ता. करवीर येथील कात्यायनी परिसरात जागतिक मधमाशी दिनानिमित्त आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी संगीता खंदारे, डॉ. पवन तेली, दयावान पाटील, संदेश जोशी उपस्थित होते.